महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय

दूरध्वनी: ०२२-६९८२०५००/५५५.
संकेतस्थळ : www.mahafireservice.gov.in
ईमेल : supdt@mahafireservice.gov.in

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.

क्रमांक : मअसे-२०२५/५५ बी/७६४८ — दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मुख्य अग्निशमन अधिकारी,
सर्व महानगरपालिका,
मुख्याधिकारी,
सर्व नगरपरिषदा.

विषय : दि.१४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत
"अग्निशमन सेवा सप्ताह" पाळणेबाबत.
निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.

महोदय,

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार संपूर्ण राज्यात दि.१४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यांत येणार आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यांत आली आहे.

०२. निबंध व चित्रकला स्पर्धेसाठी सविस्तर परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. म्हणून आपणांस विनंती करण्यांत येत आहे की, सदर परिपत्रकाच्या प्रती आपल्या महानगरपालिका/नगरपरिषदेच्या हददीतील सर्व संबंधित शाळांमध्ये पाठवून अधिकतम शाळांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यांस उद्युक्त करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

वारीक 26/11/25

(एस.एस.वारीक)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालिन सेवा

सहपत्र : वरीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय

दूरध्वनी: ०२२-६९८२०५००/५५५.
संकेतस्थळ : www.mahafireservice.gov.in
ईमेल : supdt@mahafireservice.gov.in

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.

क्रमांक : मअसे-२०२५/५५ बी/१६४८ दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२५

प रि प त्र क

विषय : दि.१४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत
"अग्निशमन सेवा सप्ताह" पाळण्यांबाबत
निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार दि.१४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात **अग्निशमन सेवा सप्ताह** पाळण्यांत येणार आहे. या सप्ताहाचा एक भाग म्हणून प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी खालील विषयानुसार राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यांत येणार आहे.

निबंध व चित्रकला स्पर्धेसाठी विषय :

मराठी - "माझ्या निवासी क्षेत्रामधील अग्निशमन कवायती "
हिंदी - " *मेरे निवासी क्षेत्र में अग्नि कवायती* "
इंग्रजी - " FIRE DRILL IN MY RESIDENTIAL AREA "

स्पर्धेसंबंधी नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत.

१. दोन्ही स्पर्धा फक्त इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थी / विद्यार्थीनीसाठी आहे.

२. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व शाळा सहभागी होऊ शकतात.

३. दोन्ही प्रकारच्या स्पर्धा शाळा प्रमुखांनी त्यांच्या सोयीनुसार आयोजित करावयाच्या असून भाग घेणा-या स्पर्धकांपैकी निबंध व चित्रकला स्पर्धा यांच्या प्रत्येकी अधिकतम सहा उत्कृष्ट प्रवेशिका सिलबंद पाकीटातून **दि.२८.०२.२०२६** पर्यंत **महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, अग्निशमन सेवा अकादमी, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८** पाठवावयाच्या आहेत.

कृ.मा.प.

०४. स्पर्धेसाठी कागद, पेंटींग पेपर, रंग व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावे.

०५ प्रत्येक स्पर्धेचा कालावधी दिड तास असेल.

०६ निबंध स्पर्धेसाठी १३" x ८" आकाराचा ओळीचा कागद वापरावा. निबंध केवळ **मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत** कमाल ५०० शब्दांपर्यंत असावेत.

०७ चित्रकला स्पर्धेसाठी १५" x ११" आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा.

०८ प्रत्येक स्पर्धेसाठी विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी व प्रमाणपत्रे **दि.२० एप्रिल, २०२६** रोजी होणा-या अग्निशमन सेवा सप्ताहाच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रदान करण्यांत येतील. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

(१) प्रथम क्रमांक : सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
(२) व्दितीय क्रमांक : सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
(३) तृतीय क्रमांक : सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
(४) उत्तेजनार्थ (तीन बक्षिसे): केवळ प्रमाणपत्र

९. विजयी स्पर्धकांना समारंभात हजर राहण्याबाबत पत्राने कळविण्यांत येईल.

१० निबंध व चित्रकला स्पर्धेतील स्पर्धकांनी प्रवेशिकाच्या मागील बाजूस स्वतःचे संपूर्ण नांव, इयत्ता, घरचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी /मोबाईल क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता व ईमेल, दूरध्वनी क्रमांक सुवाच्च अक्षरात लिहिणे आवश्यक आहे.

११. शाळा प्रमुखांना प्रत्येक स्पर्धेसाठी अधिकतम सहा प्रवेशिका स्वतंत्रपणे पाठवावयाच्या असून प्रत्येक पाकीटावर ठळक अक्षरात **"अग्निशमन सेवा सप्ताह-२०२६-निबंध-चित्रकला स्पर्धा"** प्रवेशिका असा उल्लेख करावा. शाळा प्रमुखांनी प्रवेशिका पाठवितांना त्यावर स्पर्धकाचे संपूर्ण नांव, पत्ता व दूरध्वनी या बाबी नोंदविल्या आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

१२. निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा यांच्या परीक्षकांचा निकाल अंतिम मानण्यांत येईल व या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

या संदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास दूरध्वनी क्र. ०२२-६९८२०५००/५५५.मो.८३६९०७४५७४ वर कृपया संपर्क साधण्यांत यावा.

वारीक
२८/११/२५

(एस.एस.वारीक)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालिन सेवा

प्रति,
मा.मुख्याध्यापक /मुख्याध्यापिका,
सर्व शाळा,
महाराष्ट्र राज्य